# जिल्हा निवड समिती अकोला

# जिल्हाधिकारी कार्यालय अकोला यांचे कार्यालयातील पदभरतीसाठी जाहिरात

# दिनांक ०५ /०२ /२०१०

जिल्हाधिकारी अकोला अंतर्गत आस्थापनेवरील समांतर आरक्षणानुसार राखीव असलेल्या खुला व प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त यांच्या रिक्त पदांसाठी खाली नमूद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून दिनांक **२२/०२/२०१०** पर्यंत अर्ज मागविण्यांत येत आहेत.

**अ) लघुटंकलेखक पदांची संख्या :- २ (वेतन श्रेणी ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००)**

| प्रवर्ग | एकुण पदे | समांतर आरक्षण | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|
| | | खेळाडू ५ % | माजी सैनिक १५% | महिला ३०% | |
| खुला | २ | ० | ० | १ | १ |
| **एकुण** | **२** | **०** | **०** | **१** | **१** |

**ब) शिपाई पदांची संख्या :- ७ (वेतन श्रेणी ४४४०-७४४० ग्रेड वेतन १३००)**

| प्रवर्ग | रिक्त पदे | समांतर आरक्षण | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रकल्पग्रस्त | | भुकंपग्रस्त | | खेळाडू ५ % | माजी सैनिक १५% | महिला ३०% |
| | | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | | | |
| खुला | ७ | ४ | २ | १ | ० | ० | ० | ० |
| **एकुण** | **७** | **४** | **२** | **१** | **०** | ० | ० | ० |

**आवश्यक शैक्षणिक पात्रता :-** **अ) लघुटंकलेखक**

**१. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण**

**२. लघुलेखनाचा वेग ८० शब्द प्रतिमिनीट**

**३. मराठी टंकलेखनाचा वेग ४० श.प्र.मि किंवा मराठी टंकलेखनाचा वेग ३० श.प्र.मि.**

**४. शासनमान्य संगणक प्रशिक्षण कोर्स (नियुक्ती पासून दोन वर्षात उत्तीर्ण होणे अनिवार्य)**

**ब) शिपाई**

**१. ४ थी इयत्ता उत्तीर्ण**

**निवड प्रक्रिया कार्यक्रम**

| | | |
|---|---|---|
| १) | दि. २२/०२/२०१० | :आवेदन पत्र स्विकारण्याची अंतीम तारीख. |
| २) | दिं ०२/०३/२०१० ते दिं ०६/०३/२०१० पर्यंत | :जिल्हाधिकारी कार्यालयातून प्रवेशपत्र वितरीत करणे |
| ३) | दि. ०७/०३/२०१० | :लेखी परीक्षेचा दिनांक. |

**सर्वसाधारण अटी :-**

१. लघुटंकलेखक या पदासाठी उमदेवाराचे वय दिनांक२२/०२/२०१० रोजी किमान १८ वर्ष आवश्यक असुन कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३३ वर्ष , इतर मागासवर्गीय व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षे राहील.

२. शिपाई पदासाठी उमदेवाराचे वय दिनांक२२/०२/२०१० रोजी किमान १८ वर्ष आवश्यक असुन शासन निर्णय क्रमांक: प्रकल्प -१००६/मु.स.३९६/प्र.क्र.५६/अ दिनांक ३ फेब्रुवारी २००७ नूसार प्रकल्पग्रस्त /भुकंपग्रस्त यांना वयोमर्यादा सरसकट ४५ वर्षापर्यंत राहील.

३. **महिला उमेदवारांकरिता. शासन निर्णय २५ मे, २००१ नुसार,**
खुल्याप्रवर्गातील , उन्नत आणि प्रगत व्यक्ति / कुटुंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० **टक्के** आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग , भटक्या जमाती (क)आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ति अथवा गटातील (क्रिमी लेअर ) महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

४. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी (Domicile) असला पाहिजे. त्याबाबत सक्षम प्राधिका-याचे रहीवाशी प्रमाणपत्राची प्रत जोडणे आवश्यक आहे.

५. अर्जदाराने अर्जासोबत सर्व प्रमाणपत्राच्या छायाप्रती (झेरॉक्स) साक्षांकिंत (Attested) करुन जोडाव्यात. तसेच एस.एस.सी./शालांत परीक्षा जेवढया संधीत उत्तीर्ण केली त्या प्रत्येक संधीच्या साक्षांकित छायाप्रती जोडाव्यात. मूळ प्रती जोडू नयेत.

६. उमेदवाराने आपले अर्ज अध्यक्ष , जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला या पत्त्यावर दिनांक २२/०२/२०१० पर्यत किंवा त्यापूर्वी रजिष्टर पोस्टाव्दारे पाठवावे किंवा कार्यालयीन वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष सादर करावेत. अर्जाची पोच न चुकता घ्यावी. पोस्टाव्दारे दिनांक२२/०२/२०१० नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत . त्याबाबत कोणतीही तक्रार मान्य केल्या जाणार नाही.

७. आवश्यक शैक्षणिक पात्रता परिपूर्ण नसलेले/ अपूर्ण/ आवश्यक प्रमाणपत्र सोबत नसलेले अथवा अर्जासोबत आवश्यक रकमेचे डी.डी.नसलेले अथवा अर्जावर स्वत:चा फोटो नसलेले अथवा चुकीचे भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही अथवा कोणताही पत्र व्यवहार करता येणार नाही.

८. उमेदवारांनी आपल्या अर्जासोबत स्वत:चे नाव व पत्ता असलेला रिकामा लिफाफा (साईज १०से.मी. X ४ सें.मी.)व त्यावर रुपये ५ चे पोष्टाचे तिकिट चिकटवावे.

९. जाहिरातीत प्रसिध्द केलेल्या नमुन्यातील अर्जावर फोटो चिटकवुन तो मुख्याध्यापक /प्राचार्य अथवा वर्ग-१, वर्ग-२चे राजपत्रीत अधिकारी यांचे कडुन साक्षांकीत केलेला असावा नसल्यास असा अर्ज स्विकारला जाणार नाही, अथवा अर्ज रद्द करण्यांत येईल.

१०. फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहीत कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत कृपया याची नोंद घ्यावी.

११. प्रत्येक अर्जदाराने महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्र) नियम ,२००५ मधील प्रतिज्ञा पत्राचा नमुना भरुन अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१२. लघुटंकलेखक या पदासाठी १०० गुणांची लेखी परीक्षा, ८० गुणांची व्यावसायीक चाचणी व मुलाखतीसाठी २० गुण राहतील. जे उमेदवार लेखी परीक्षेत पात्र ठरतील अश्याच उमेदवारांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल.त्याच प्रमाणे परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी,सामान्यज्ञान, अंकगणित या विषयावरील प्रश्नाकरीता प्रत्येकी २५ गुण ठेवून एकुण १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रिका बहूपर्यायी स्वरुपाच्या असतील. जिल्हास्तरीय पदांसाठी निवड होणा-या उमेदवारांना संबधित जिल्हयाचा भुगोल, सामाजिक इतिहास, व हवामान इत्यादि स्थानिक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे.

१३. शिपाई या पदाकरिता शासन निर्णय क्रं एसआरव्ही -२००४/प्र.क्र.१२/०४/१२ दिनांक ७ जुन २००४ नूसार ७५ % लेखी परीक्षा व २५ % तोंडी परीक्षा घेण्यात येईल

१४. लघुटंकलेखक पदाकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत रुपये **२००/- ( रु. अक्षरी एकशे पन्नास)** व मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये १५०/**- (अक्षरी रु. एकशे पन्नास)**चा राष्ट्रीयकृत बँकेचा क्रॉस डिमांड ड्राफ्ट (डी.डी.) किंवा बँकर्स चेक जोडावा. राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफट (डी.डी.) किंवा बॅकर्स चेक नसल्यास अर्ज रद्द करण्यांत येईल.नंतर कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

१५ शिपाई पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांना परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यकता नाही.

१६. सदर डीमांड ड्राफ्ट किंवा बॅंकर्स चेक **अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी अकोला** या नावाने असणे आवश्यक राहील. डी.डी. किंवा बँकर्स चेक अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी अकोला या नावाने नसला किंवा अपूर्ण नावाने असला तर अर्ज रद्द करण्यांत येईल. कृपया याबाबतची नोंद घ्यावी.

१७. सदर जाहीरात ही www.akola.nic.in या अकोला जिल्हयाच्या संकेत स्थळावर पहावयास मिळेल.

१८. लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र दिनांक ०२/०३/२०१० ते०६/०३/२०१० पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत वितरीत करण्यात येतील.

१९. समांतर आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीस लागु राहील.समांतर अरक्षण हे सामाजिक आरक्षणातंर्गत असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणन्यात येणार नाही.

२०. सदरच्या कार्यक्रमामध्ये बदल अथवा रद्द करण्यांचे अधिकार जिल्हा निवड समितीकडे राखून ठेवण्यांत आलेले आहेत.तसेच वरील रिक्त पदांमध्ये वाढ किंवा घट होण्याची शक्यता असल्यामुळे रिक्त पदांच्या संख्येत झालेल्या बदलाबाबत कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही.

दिनांक : ०३/०२/२०१०
ठिकाण: अकोला.

स्वाक्षरी
**अध्यक्ष**
जिल्हा निवड समिती, तथा
जिल्हाधिकारी अकोला

# अर्जाचा नमुना

## लघुटंकलेखक / शिपाई पदासाठी अर्ज

उमेदवाराचा
मुख्यांध्यापक /
प्राचार्य अथवा
राजपत्रीत अधिकारी
व्दारे स्वाक्षांकित
अलीकडील पासपोर्ट
आकाराचा फोटो

**प्रति,**

**अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी,**
**जिल्हा निवड समिती, अकोला.**

**विषय :** लघुटंकलेखक / शिपाई पदासाठी विनंती अर्ज

**संदर्भ :** **दैनिक ------------------------या वृत्तपत्रातील जाहीरात दिनांक -------------------**

आपले कार्यालयाची दैनिक वर्तमानपत्रात नमूद जाहिरातीनुसार मी ---------------------------- या पदाकरिता अर्ज सादर करित आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | संपूर्ण नांव | (आडनाव प्रथम नंतर स्वत:चे नाव व शेवटी वडीलाचे / पतीचे नाव) | | |
| २ | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | | | |
| ३ | राष्ट्रीयत्व | | | |
| ४ | जात व प्रवर्ग | | | |
| ५ | जन्म तारीख | दिवस | महिना | वर्ष |
| ६ | शिपाई पदासाठी समांतर आरक्षणाचा प्रकार ( ✓ अशी खूण करावी) | प्रकल्पग्रस्त / भुकंपग्रस्त | | |
| ७ | लघुटंकलेखन पदासाठी समांतर आरक्षणाचा प्रकार ( ✓ अशी खूण करावी) | महिला /खुला | | |
| ८ | महाराष्ट्राचा मूळ रहिवासी आहे काय १ (Domicial) | होय / नाही | | |
| ९ | उन्नत व प्रगत गटात मोडतो / मोडते काय? (असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडावे) | होय / नाही | | |
| १० | अर्जदार प्रकल्पग्रस्त उमेदवार आहे काय ? (असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी.) | होय / नाही | | |
| ११ | अर्जदार भुकंपग्रस्त आहे काय ? (असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत जोडावी.) | होय / नाही | | |
| १२ | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय १ | होय / नाही | | |
| १३ | लिंग | पुरुष / महिला | | |
| १४ | दिनांक २२.०२.२०१० रोजीचे वय | दिवस | महिना | वर्ष |

१५. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता

| अ.क्र | शैक्षणिक पात्रता | उत्तीर्ण वर्ष | बोर्ड / विद्यापीठ | एकुण गुण | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |

१६. संगणक अर्हता
१७. इतर पात्रता

१८. धनाकर्ष / बॅकर चेक क्रमांक व बॅकेचे नांव
रु................ क्रमांक ........................... दिनाक ...................२००९-१० बॅकेचे नाव..............................

१९. अर्जासोबत अर्जदाराने स्वता:चे पासपोर्ट आकाराचे दोन फोटो त्यापैकी एक अर्जावर चिटकावा व एक फोटो स्टेपल करुन जोडावा.

२०. वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. मी कनिष्ठ लिपीक या पदासाठी अर्ज सादर करित आहे.सदर पदासाठी विहीत केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण केली आहे, ही खात्री करुनच अर्ज सादर करीत आहे. मी असेही प्रमाणित करतो की वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमविण्यास व त्या अनुषंगाने होणा-या कायदेशीर कारवाईस मी पात्र व बांधिल राहिल या बाबत माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

ठिकाण :-
दिनांक :- अर्जदाराची स्वाक्षरी

# लघुटंकलेखक / शिपाई पदाकरिता उमेदवाराचे ओळखपत्र

## (लेखी परीक्षेकरिता)

उमेदवाराचे नांव : ....................................

उमेदवाराचा संपुर्ण पत्ता : ....................................

......................................

आरक्षणाचा प्रकार : ......................................

---

(फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता)

परीक्षा केद्र :- --------------------------------------

--------------------------------------

--------------------------------------

बैठक क्रमांक :- --------------------------------------

परीक्षा दिनांक :- -------------------------------------

उमेदवाराची स्वाक्षरी :- प्राधिकृत अधिकाऱ्याची स्वाक्षरी

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमुना - अ**

# प्रतिज्ञापन

## नमुना - अ

## (नियम ४ पहा)

मी, श्री/श्रीमती/कुमारी ------------------------------------------------------------------------------------------

श्री ------------------------------------------------------------ यांचा /यांची/मुलगा/मुलगी/पती, वय ------- वर्ष,

राहणार ---------------------- या व्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/ करते की,

१. मी ----------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला ----- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या , मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :-

उमेदवाराची सही

# जिल्हाधिकारी कार्यालय ,अकोला यांचे कार्यालयातील लघुटंकलेखक / शिपाई पदभरतीसाठी जाहिरात दिनांक०५/०२/२०१०